9:54 AM | 222KB/s

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com



विद्या प्रतिष्ठान व क्विकहील फाउंडेशन यांच्यात सायबर सुरक्षेबाबत सामंजस्य करार पार पडला.

# विद्या प्रतिष्ठानच्या विद्यार्थ्यांना मिळणार सायबर सुरक्षेचे धडे

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

विद्या प्रतिष्ठानच्या कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्याबरोबरच सामाजिक व व्यावहारिक अनुभवातून सायबर सुरक्षेचे धडे मिळणार आहेत. या उपक्रमाचे हे दुसरे वर्ष आहे. महाविद्यालयातील बी. बी. ए. (सी.ए.) विभाग आणि क्विकहिल फाउंडेशन या दोन संस्थेमध्ये कमवा आणि शिका या उपक्रमाअंतर्गत नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. या करारावर प्राचार्य डॉ. भरत शिंदे आणि क्विक हिल फाउंडेशनचे अजय शिर्के यांनी स्वाक्षरी केली.

या उपक्रमाचा उद्देश शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांना सामाजिक जागरूकतेमध्ये सक्षमपणे सहभागी करून घेणे आहे. या कराराअंतर्गत चालणाऱ्या या योजनेमध्ये विद्यार्थ्यांना विविध शाळा, महाविद्यालयात तसेच सार्वजनिक ठिकाणी जाऊन समाजातील सर्व घटकांमध्ये सायबर जागृतीचे काम करावयाचे आहे. या उपक्रमासाठी महाविद्यालयातील सलमा शेख या समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत. शिवानी छेडे, सागर मेरावी, रितेश धापटे, ऋतुजा कळसकर हे विद्यार्थी क्लब मेंबर म्हणून काम पाहणार आहेत.

सदर उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्राचार्य डॉ. शिंदे, उपप्राचार्य डॉ. श्यामराव घाडगे, उपप्राचार्य डॉ. लालासाहेब काशीद, बी.बी.ए (सी.ए.) विभाग प्रमुख महेश पवार, बी.एस.सी.(संगणक शास्त्र) विभाग प्रमुख गजानन जोशी, बी.एस.सी.(संगणक उपयोजन) विभाग प्रमुख किशोर ढाणे, गौतम कुदळे, डॉ. जगदीश सांगवीकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विशाल शिंदे, अनिल काळोखे, पूनम गुंजवटे, अक्षय भोसले, वैशाली पेंढारकर, कांचन खिरे, अक्षय शिंदे यांनी सहकार्य केले.

My Gramin Edition
Jun 27, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com